महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र विषयाच्या प्रंबधातील उल्लेखांचे विश्लेषण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतर विद्याशाखीय अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

वर्षा दत्तात्रये गच्चे

(M. Lib. & I.Sci., SET)

मार्गदर्शक

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती

प्राचार्य

कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड

ता. गंगाखेड, जि. परभणी

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

एप्रिल -२०२५

प्रस्तावना (Introduction) :-

आज आपण माहितीच्या युगात वावरत आहोत. भारत हा प्रगतशिल देश असल्यामुळे कालपरत्वे व त्या-त्या वेळेच्या गरजेनुसार विशिष्ट क्षेत्राला प्राधान्य दिले गेले व त्या विषयात किंवा क्षेत्रात क्रांती घडवून आणली त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे माहितीची क्रांती होय. या क्रांतीची सुरूवात होण्यास माहिती तंत्रविज्ञानातील द्दतगतीने झालेली प्रगती व माहितीचे समानात होणारे उत्सरण किंवा प्रसार हे प्रमुख कारण आहे. माहिती ही त्यामागची प्रेरणाशक्ती आहे. ही क्रांती व माहितीचा प्रसार समाजाच्या सर्व घटकांमध्ये कमी-जास्त फरकाने होत आहे.[1]

सामाजिक शास्त्रामध्ये मानसशास्त्र या शास्त्राला महत्वाचे स्थान आहे. मानसशास्त्र म्हणजे मन आणि वर्तनाचा वैज्ञानिक अभ्यास आहे. त्याच्या विषयात मानव आणि अमानवाने वर्तन जाणीव आणि बेशुध्द अशा दोन्ही घटना आणि विचार, भावना आणि हेतू या सारख्या मानसिक प्रक्रियाचा समावेश होतो.2 जर्मन तत्वज्ञ रूडॉल्फ गॉकेल यांच्या मते, मानसशास्त्र या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्दापासून झाली आहे.

Psyche म्हणजे आत्मा आणि Ology म्हणजे वैज्ञानिक अभ्यास या दोन शब्दांपासून मानसशास्त्र हा शब्द बनला. मानसशास्त्राचे जनक पिता म्हणून विल्हेल्म मॅक्सिमिलियन वुड यांना ओळखले जाते. थोर ग्रीक तत्वेता ॲरिस्टॉटल यांनी डि अनिमा या ग्रंथात मानसशास्त्रासंबंधी

व्याख्या सांगितली आहे. "मानसशास्त्र म्हणजे मनाचा अभ्यास करणारे शास्त्र होय". एकंदरीत पाहता मानसशास्त्र मानवी मन व भाव-भावना व इतर गोष्टींचा विचार केला जातो.

आधुनिक शिक्षण संपूर्णत: मानसशास्त्रावर अवलंबून आहे. बालकाचा सर्वांगीण विकास व्हावा हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्टे आहे. हे उद्दिष्ट कसे साध्य करता येईल याचे मार्गदर्शन मानसशास्त्र करते.[3]

Bibliometritc ही पध्दती ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधनाचे तंत्र म्हणून वापरली जाते. 19 व्या शतकात ग्रंथालय व माहितीशास्त्रात एक वेगळा दृष्टीकोन निर्माण झाला आहे. Bibliometritc म्हणजे ग्रंथाचे मापन होय. किंवा ग्रंथमिती होय. Bibliometrites या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेपासून झाली. Biblio आणि metric या दोन शब्दापासून बनला आहे. Biblio म्हणजे ग्रंथ (Book) आणि metric म्हणजे मापन होय.

Bibliometrics या पध्दतीद्वारे ग्रंथालय व ग्रंथालयीन साहित्याचे मोजमाप अतिशय सोप्या पध्दतीने केले जाते. विषयाचा विस्तार मोजण्यासाठी या पध्दतीचा वापर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात केला जातो. ॲलन पीचर्ड यांनी 1969 मध्ये Bibliometrics या संज्ञाचा उपयोग सर्व प्रथम केला आहे. Bibliometrics ह्या साहित्याचा दर्जा मापनाचे तंत्र किंवा साधन उदयास आले. या तंत्राचा उपयोग विज्ञान

तंत्रज्ञान तसेच विशेष क्षेत्रात केला जात आहे. यामध्ये वेवोमॉट्रक्स, सायड्रोमेन्ट्रक्स, Librametric इत्यादी तंत्राचा वापर संशोधनाचे साधन म्हणून उपयोग करता येतो. कारण प्रकाशित साहित्याचे मोजमाप करणे अतिशय सोपे जाते. त्यासाठी सर्व नियम, अटी प्रत्यक्षपणे जुळू शकतात. रोजच्या समस्या, प्रक्रिया सोडविण्यासाठी गणितीय व सांख्यिकी पध्दतीचा वापर केला जातो.[4]

उल्लेख विश्लेषण (Citation Analysis) :-

संशोधनाची सुरूवात ही एखाद्या समस्याने होत असते. समस्या सोडविण्यासाठी विशिष्ट तंत्राचा वापर करावा लागतो. संशोधन करताना संशोधकाला त्याच्या अगोदरच्या संशोधकाच्या संशोधनाचा आधार घ्यावा लागतो. संशोधकाने संशोधनासाठी शोधसाहित्य वापरणारी ग्रंथ साहित्याची संदर्भसुचीचा उल्लेख शेवटी दिला जातो. Bibliometrics संबधित संशोधनात दोन पध्दतीचा वापर होतो. सांख्यिक मूल्यमापन आणि गुणात्मक मूल्यमापन अशा मुख्य शाखा उदयास आल्या आहेत. सांख्यिकी मूल्यमापनात गणिती सिध्दांत आणि संख्या शास्त्राच्या वापरावर भर असतो. Bibliometrics पध्दती ही संदर्भ उल्लेख विश्लेषण म्हणजे सायटेशन अनालिसिस ही मोठ्या प्रमाणावर वापरली जाते.

1955 मध्ये युजीन गारफिल्ड यांनी उल्लेख विश्लेषण (Citation Analysis) महत्वपूर्ण सहकार्य केले. ग्रंथालय व माहितीशास्त्रासाठी उल्लेख

विश्लेषण हे एक प्रभावी तंत्र पध्दती आहे. संशोधक पूर्ण लेख लिहिताना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास सायटेशन असे म्हण्तात. सायटेशन ॲनलिसिस या पध्दतीच्या विश्लेषणाचा संबंध हा कोण कुणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो याच्याशी आहे.

संशोधन करताना संशोधकाने जर विद्‌ववान लेखकाचा लेख आपल्या संशोधनात लिहिला तर त्याचा संदर्भ देण्याच्या पध्दतीला Citation असे म्हणतात. ते लेखाच्या खाली किंवा प्रकरणाच्या शेवटी दिलेले असतात.

उल्लेख विश्लेषण या पध्दतीचा विश्लेषणाचा संबंध हा कुणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो यांच्याशी आहे.[5]

संशोधन विषयाची निवड (Selection of Research Topic) :-

संशोधन कार्याची सुरूवात करताना विषयाची वास्तविकता सद्‌यस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. माहिती ही एक सामाजिक संपत्ती आहे. माहितीच्या युगात माहितीचा प्रचंड प्रमाणात वापर आपणाला दिसून येतो. यामध्ये विविध विषयाची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, पीएच.डी. प्रबंध इत्यादी माहितीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होतो. प्रस्तुत विषयामध्ये या साधनाचा उपयोग कितपत झाला आहे. कोणत्या साहित्याचा वापर हा जास्तीत जास्त झाला आहे हे सुक्ष्मपणे तपासून घेणे गरजेचे वाटते. मानसशास्त्र या विषयातील वस्तुस्थिती,

वास्तविकता तपासणे, मानसशास्त्राचे भुतकाळ व वर्तमान काळानुसार बदलते. स्वरूप जावून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्ये गरजेचे आहे. सद्यस्थितीतील हीच गरज लक्षात घेवून महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र विषयाच्या प्रंबधातील उल्लेखांचे विश्लेषण या विषयाची निवड संशोधनाकरीता करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्‌दिष्टे (Objective The Research) :-

कोणतेही संशोधन कार्य करीत असताना संशोधक काही उद्‌दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संशोधन कार्य करीत असतो. संशोधनास योग्य दिशा मिळावी व संशोधन हे हेतुपूर्ती करिता असावे असे अपेक्षित असते. यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्‌दिष्टे निर्धारित केलेली आहेत.

1. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र या विषयावरील प्रबंधाचे ग्रंथसुचीय व विषयाप्रमाणे विश्लेषण करणे.
2. संदर्भित प्रलेखाचे प्रकार (फॉर्मनुसार) शोधणे.
3. संदर्भित प्रलेखाचे कालक्रमानुसार विभागणी करणे.
4. एकाच लेखकांनी लिहिलेल्या लेखांची किंवा पुस्तकांची वारंवारिता काढणे.
5. संदर्भित मासिके आणि पुस्तकांची क्रमवारिता अभ्यासणे.

6. भारतीय व परदेशातील उध्दरणांचे/उल्लेखांचे वर्गीकरण करणे.

7. छापील ग्रंथ आणि ई-स्रोत वापराचे विश्लेषण करणे.

गृहितके (Hypothesis) :-

परिकल्पना हे संशोधनाचे केंद्रबिंदू असते. संशोधन करण्यापूर्वी जी सामान्य उत्तरे गृहित धरली जातात त्यास गृहितके संबोधले जातात. गृहितके हे संशोधनास गती देण्याचे काम करतात म्हणून संशोधकानी गृहितकृत्ये ही निश्चित केली जातात त्यामुळे प्रस्तूत संशोधनाची खालील गृहितकृत्ये मांडली आहेत.

1. संशोधनासाठी नियतकालिकेचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर केला गेला आहे.

2. संशोधक जास्तीत-जास्त भारतीय प्रकाशनाची ग्रंथ वापरतात.

3. पुरूष संशोधक त्यांच्या विषयक्षेत्रात महिला संशोधकापेक्षा प्रबळ आहेत.

4. बहुलेखकापेक्षा एक लेखक असणारे वाचन साहित्य जास्त प्रमाणात उलपब्ध आहेत.

संदर्भित साहित्याचा आढावा (Review of Related Literature) :-

पूर्व साहित्याचा आढावा हा नव्या संशोधनाच्या संदर्भात उपयुक्त असतो. म्हणून संशोधकाला नव्या अभ्यास विषयाकडे नव्या दृष्टीने पाहता

येते. संशोधनासाठी घेतलेला नवीन विषय प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या पूर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. संशोधकाने निवडलेल्या विषयाशी संबंधीत साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील एक महत्वपूर्ण भाग असतो.

पी. राजेंद्र (2005), ''Bibliometric analysis of fiber optics literature'', Ghar, V. P. (2016), ''Bibliometric study of Journal of Biosciences published during the year 2003 to 2004'', कुलकर्णी ए. पी. (2009), ''Indian Journal of Pharmaceutical Education and Research (1996-2006) a Bibliometric Analysis''.

संशोधन पध्दती (Research Method) :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालील संशोधन पध्दती उपयोगात आणली.

संशोधन आराखडा (Research Design) :-

संशोधनाचे कार्य हे योजनाबध्द करण्यासाठी तसेच संशोधन कशा पध्दतीने करायचे आहे यांच्या कार्ययोजनांचा आराखडा आखणे.

संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ट संशोधन करणे अशक्य आहे. म्हणून संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन आराखडा निश्चित केला जातो. या कार्यप्रणालीच्या एका समुहामध्ये तथ्य संकलन व विश्लेषण

समाविष्ट केले जाते. प्रस्तुत संशोधनात निरिक्षण संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे.

नमुना निवड **(Sample Method) :-**

"शितावरून भाताचे परिक्षण" हे नमुना निवडीचे उत्तम उदाहरण आहे. सामाजिकशास्त्रातील एक अविभाज्य भाग म्हणून नमुना निवड पध्दतीचा उल्लेख केला जातो. प्रस्तुत संशोधनाकरीता नमुना निवड प्रकारातील संभाव्य नमुना निवड पध्दती अंतर्गत ग्रिड पध्दतीचा अवलंब केला जाईल. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र या एका विषयाचा समावेश आहे. मानसशास्त्र या विषयामध्ये सादर केलेल्या प्रबंधाचा समावेश केला जाईल.

तथ्य संकलन **(Datta Collection) :-**

कोणत्याही संशोधनास तथ्य महत्वाची असतात. विषयाच्या अनुषंगाने तथ्याचे संकलन केले जाते. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला विशेष महत्व आहे. वास्तविकता तथ्य हा असा मार्ग आहे की, ज्याच्या साह्याने संशोधनास एक विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. या अनुषंगाने संशोधनाकरिता प्राथमिक व दुय्यम स्रोताचा वापर करता येतो. प्राथमिक स्रोताचा वापर करून अनेक प्रबंध व लेख यात त्याचा उपयोग होत असतो. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र विषयाच्या प्रंबधातील उल्लेखांचे विश्लेषण यामध्ये निरिक्षण पध्दतीद्वारे

तथ्य संकलन करण्यात येईल व दुय्यम स्रोतामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला जाईल. संशोधनासाठी तथ्य संकलन ही अनिवार्य बाब आहे. तथ्य संकलन करताना माहितीच्या प्राथमिक व द्वितीय स्रोताचा या पध्दतीद्वारे तथ्य संकलन केले जाते.[6]

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope & Limitation of Research) :-

संशोधनासाठी विषयाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी विषयाची व्यापकता त्या विषयाच्या अंतर्गत येणाऱ्या उपविषयाची निवड तसेच विशिष्ट विषयाची माहिती किती सखोल घ्यायची, व त्या संशोधनासाठी विषयाची व्याप्ती निश्चित करावी लागेल. विषयाची व्यापकता अंतर्गत येणाऱ्या उपविषयावरील माहिती सखोलता व त्याची मर्यादा निश्चित करावी लागते. संबंधीत संशोधन विषय हा कोणत्या क्षेत्रापूरती मर्यादित आहे याची माहिती घ्यावी लागते. या हेतूने प्रस्तुत संशोधन विषय हा महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मानसशास्त्र विषयाच्या प्रंबधातील उल्लेखांचे विश्लेषण या विद्यापीठपुरते मर्यादित आहे. तसेच अनेक विद्याशाखापैकी मानव्य (Humanities) विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या मानसशास्त्र प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

संशोधन विषयात महाराष्ट्रातील एकूण अकरा (11) विद्यापीठांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी नऊ (09) विद्यापीठांमध्ये

मानसशास्त्र या प्रबंधाचा समावेश आहे. त्या विद्यापीठाची यादी खालील प्रमाणे.

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ
2) मुंबई विद्यापीठ
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर
4) सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ
5) संत गाडगे बाबा अमरावती, विद्यापीठ
6) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
7) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
8) बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
9) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ (श्री नाथीबाई दामोदर ठाकरसे महिला विद्यापीठ)

संशोधन विषयाची व्याप्ती वरील विद्यापीठापुरतीच आहे. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्रातील विद्यापीठात सादर केलेल्या मानसशास्त्र या विषयातील 200 पीएच.डी. प्रबंधापुरती मर्यादित आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठातील ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांमध्ये शोधगंगा या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या मानसशास्त्र या विषयात पीएच.डी.साठी 2010-2023 पर्यंत प्रबंधापुरती मर्यादित आहे.

प्रकरणनिहाय रचना :-

प्रकरण पहिले	:-	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:-	संदर्भ साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे	:-	माहितीचे विश्लेषण
प्रकरण चौथे	:-	तथ्यांचे विश्लेषण व अर्थविवेचन
प्रकरण पाचवे	:-	निष्कर्ष व शिफारशी
परिशिष्ट्ये	:-	संदर्भग्रंथ

संशोधनाचा कालावधी (Year wise of work) :-

प्रस्तुत संशोधन हे तीन वर्षाच्या कालावधीसाठी पूर्ण करण्याचे योजिले आहे. त्यासाठी लागाणरा कालावधी खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे.

अ.क्र.	प्रकरणाचे क्रमांक	प्रकरणाचे नाव	कालावधी
1	प्रकरण पहिले	प्रस्तावना	चार महिने
2	प्रकरण दुसरे	संदर्भ साहित्याचा आढावा	आठ महिने
3	प्रकरण तिसरे	संदर्भ साहित्याचा आढावा	सहा महिने
4	प्रकरण चौथे	तथ्यांचे विश्लेषण व अर्थविवेचन	आठ महिने
5	प्रकरण पाचवे	निष्कर्ष व शिफारशी	चार महिने

संदर्भसूची :-

1. भट्ट शरद, (2008), इलेक्ट्रॉत्मक माहिती साधणे, अशोक पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.1
2. https://eh.wikipedia.org
3. दोनमुटे महावेश, (2014), Research Thoughts, Volume, 4 Isshe-5
4. कोण्णूर एम.बी., (2000), ग्रंथालय व माहितीशास्त्र कोष, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
5. फडके द. ना., (2012), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे-249.
6. प्रतिप आगलावे, (2000), संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

संशोधक
वर्षा दत्तात्रये गच्चे
(M. Lib. & I.Sci., SET)

मार्गदर्शक
डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती
प्राचार्य
कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड, जि. परभणी